# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**कालमर्यादित :**
**दि.३१.०५.२०१९.**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/वि.ता.प्रश्न/२०१९/ 2143
दिनांक : 29 MAY 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक /संस्थापक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व विना अनुदानित
पदवी व पदव्युत्तर पदवी सस्था.
(पुणे विभागे)

**विषय :- राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील नियमानुसार वेतन न देणा-या संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी, श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. सुनिल केदार (सावनेर), श्री. अमर काळे (आर्वी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), ॲड. यशोमती ठाकूर (तिवसा).**

संदर्भ :- मा. कक्ष अधिकारी महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय विधान भवन, मुंबई यांचे पत्र १०३२/तांशि-४, दि. २२/०५/२०१९.

उपरोक्त संदर्भांकित महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन मुंबई यांचे पत्रानुसार, राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नियमानुसार पगार देण्याचे बरेचसे संस्थाचालक नाकारत असून, पूर्ण पगार न मागण्याचे व त्याबाबत तक्रार न करण्याचे प्रतिज्ञापत्र घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या नियमानुसार प्राध्यापकांना नियमित वेतन देणे बंधनकारक असून, त्याबाबत संस्थांकडून वेतन पुरविले जात नसल्याने, संस्थांच्या विरोधात सातत्याने आंदोलने होत आहेत. त्यानुसार नियमानुसार वेतन न देणा-या संस्था चालकांवर कारवाई कराण्याचे सूतोवाच करण्यात आलेले आहे.

तरी आपण आपल्या संस्थेची वरील विषयाबाबतची वस्तुस्थिती स्वयंस्पष्ट अभिप्रायासह **दिनांक ३१.०५.२०१९ रोजी, दुपारी ०३:०० वाजेपर्यंत** या विभागीय कार्यालयास विनाविलंब कळवावी. जेणेकरुन सदरची माहिती दोन दिवसांचे आंत विधानमंडळास सादर करणे शक्य होईल.

सोबत - तारांकित प्रश्न .

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

१०३२/तांशि-४
२२/५/१९

क्रमांक - ______ / ब-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक -

प्रेषक:

सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

**उप सचिव**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय: विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक - १३४८८७**

महोदय,

**उपरिनिर्दिष्ट प्रश्नाबाबतची वस्तुस्थिती** या सचिवायलास **त्वरीत दोन दिवसात कळवावी** अशी विनंती आहे.

सदरहू प्रश्न स्वीकृत करण्यासारख्या आहे की नाही हे ठरविण्यासाठी ही माहिती आवश्यक असून ती हे पत्र मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत या सचिवालयास कळवावी. उक्त अवधीत आपणाकडून माहिती न आल्यास, प्रश्न स्वीकृत होऊन तो शासनाकडे उत्तरासाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे

सदरहू प्रश्न स्वीकृत झाल्यास, तो दिनांक १७-०६-२०१९ रोजी उत्तरासाठी ठेवण्यात येईल.

आपला

कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

---

**विषय - राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामधील नियमानुसार वेतन न देणाऱ्या संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत**

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. सुनिल केदार (सावनेर), श्री. अमर काळे (आर्वी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ. संतोष टारफे (कळमनुरी), ॲड. यशोमती ठाकूर (तिवसा)**

**सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामधील घटणाऱ्या विद्यार्थी संख्येचे कारण पुढे करत नियमानुसार पगार देण्याचे संस्थाचालकांनी नाकारले असून नियमानुसार वेतन न मिळणाऱ्या कंत्राटी प्राध्यापकांना येणारा अनुभव पूर्णवेळ नियमित प्राध्यापकांनाही येत असून सहायक प्राध्यापक पदासाठी निवड करताना नियमानुसार पूर्ण पगार न मागण्याचे किंवा त्याबाबत कुठेही तक्रार न करण्याचे प्रतिज्ञापत्र घेण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमानुसार नियमित प्राध्यापकांना वेतन देणे बंधनकारक असताना संस्थाकडून वेतन बुडविले जात असल्यामुळे संस्थांच्या विरोधात सातत्याने आदोलने होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार नियमानुसार वेतन न देणाऱ्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

Shri More
तांशि-४
२४/५/१९

विवि
२३/५/१९

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
24 MAY 2019
आवक क्र. 5020